महाराष्ट्र शासन

# ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई- ४०० ००१

**दूरध्वनी क्र.** :-(०२२) २२६६४६३८

**Website**:-www.dol.maharashtra.gov.in **E-mail**:-director.dol@maharashtra.gov.in

जा. क्र.३१/रा.रा.रॉ.ग्रं.प्र./प्रसिध्दी/२०२६-२७/२९१३ दिनांक:-२०/०८/२०२६

**ई-मेलव्दारे**

**प्रति,**

**सहाय्यक ग्रंथालय संचालक,**

अमरावती/छत्रपती संभाजीनगर/नागपूर/नाशिक/पुणे/मुंबई विभाग

**विषय :- राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या सन २०२६-२७ करीता समान व असमान निधी योजनांचे प्रस्ताव सादर करणेबाबत मुदतवाढ देणेबाबत.**

**संदर्भ**: - १. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांचे पत्र क्र. F.2-11/DIR/SCL/ 2026-27 Dt. 09/07/2026 व 17/08/2026

२. संचालनालयाचे पत्र क्र.३१/रा.रा.रॉ.ग्रं.प्र./प्रसिध्दी/२०२६-२७/२१८७-८८, दि.१६/०७/२०२६

भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागातंर्गत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या समान निधी व असमान निधी योजनेंतर्गत राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी अर्थसहाय्याच्या विविध योजनांचा लाभ इच्छुक ग्रंथालयांना दरवर्षी देण्यात येतात. संदर्भ क्र.१ अन्वये प्रतिष्ठानकडून समान निधी योजनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. **सदर विषयी संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये दि.२१/०८/२०२६ पर्यत प्रस्ताव मागविण्यात आले होते. तथापि, सदर प्रस्ताव पाठविण्यास या पत्रान्वये पुढीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.**

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या समान निधी व असमान निधी योजनांसाठीचा लाभ नोंदणीकृत शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी घेण्याच्या अनुषंगाने सदर योजनेचा विहित नमुन्यातील परिपूर्ण प्रस्ताव ऑनलाईन व ऑफलाईन (चार प्रतीत) **दिनांक ३१/०८/२०२६** पर्यंत संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांकडे सादर करावेत. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांनी प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन परिपूर्ण प्रस्ताव शिफारशीसह **दिनांक ०७/०९/२०२६** पर्यंत सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालयाकडे पाठवावेत. सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालयांनी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांची बारकाईने तपासणी करून विहित नमून्यातील परिपूर्ण प्रस्ताव आपल्या शिफारशींसह व्दिप्रतीत **दिनांक १५/०९/२०२६** पर्यंत संचालनालयास ऑनलाईन व ऑफलाईन सादर करावेत.

सन २०२६-२७ साठी समान निधी/असमान निधी योजनेंतर्गत विविध योजनांसाठी प्रस्ताव सादर करताना संचालनालयाचे पत्र क्र. ३१/२०२३-२४/४०८३, दि. २५/०८/२०२३ अन्वये ग्रंथालयांच्या सद्य:स्थितीबाबतचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक राहील.

प्रसिध्द करावयाचे निवेदन या पत्रासोबत जोडले आहे. आपल्या विभागातील प्रमुख वृत्तपत्रांतून सदर निवेदन विनामुल्य प्रसिध्दीस द्यावे, व आलेल्या वृत्ताची कात्रणे व अहवाल संचालनालयास सादर करावा.

**(अशोक मा. गाडेकर )**

**प्र. ग्रंथालय संचालक**

**सहपत्र** :- १) वृत्तपत्रांत प्रसिध्दी देण्यासाठीचे निवेदन

२) प्रस्ताव शिफारीत करण्याच्या दृष्टीने महत्वाच्या सूचना

**प्रत** :- सर्व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालये

# निवेदन

**राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या सन २०२६-२७ च्या समान व असमान निधी योजनांसाठी शासनमान्य ग्रंथालयांनी प्रस्ताव सादर करण्यास मुदत वाढ देणेबाबत.**

## ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - ४०० ००१

भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या समान निधी व असमान निधी योजनेंतर्गत राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी अर्थसहाय्याच्या विविध योजना ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत राबविण्यात येतात.

सन २०२६-२७ साठी विविध समान व असमान निधी योजनांचा लाभ घेण्यासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून विहित नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. त्या संदर्भातील नियम, अटी व अर्जाचा नमुना प्रतिष्ठानच्या www.rrrlf.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक ग्रंथालयांनी अर्जाचा नमुना संकेतस्थळावरुन उपलब्ध (download) करुन घ्यावा.

**सन २०२६-२७ साठीच्या समान निधी योजना पुढीलप्रमाणे आहेत. (Matching Schemes)**

१) इमारत बांधकाम व विस्तार अर्थसहाय्य योजना - कमाल रु. २५.०० लाख

**टिप**:- उपरोक्त योजनेव्यतिरिक्त समान निधी योजनेंतर्गत इतर योजनांचा लाभ केंद्रीय पध्दतीने देण्यात येत असल्यामुळे इतर योजनेसाठीचे प्रस्ताव सादर करु नयेत.

**सन २०२६-२७ साठीच्या असमान निधी योजना पुढीलप्रमाणे आहेत. (Non-Matching Schemes)**

१) ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ,साधनसामग्री, फर्निचर, इमारत बांधकाम व विस्तार यासाठी अर्थसहाय्य-(फर्निचर खरेदी रु. ४.०० लाख व इमारत बांधकाम (प्रस्ताव फक्त एकदाच) रु. १० ते १५.०० लाख)

२ "ज्ञान कोपरा" विकसित करण्यासाठी अर्थसहाय्य-(रु. २.५० लाख)व विशेष अर्थसहाय्य आधुनिकीकरण (रु. २.०० लाख)

३) महोत्सवी वर्ष जसे ५०/६०/७५/१००/१२५/१५० वर्ष साजरे करण्यासाठी अर्थसहाय्य –(रु.६.२० लाख/ व इमारत विस्तार रु. १०.०० लाख)

४) राष्ट्रस्तरीय चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व जागरुकता कार्यक्रम आयोजनासाठी अर्थसहाय्य (रु. १.५०लाख/रु. २.५० लाख/रु. ३.०० लाख)

५) "बालकोपरा" स्थापन करण्याकरीता अर्थसहाय्य कमाल(रु. ६.८० लाख )

**➢उपरोक्त योजनेसाठी करावयाचा अर्ज :-**

वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी प्रतिष्ठानचे www.rrrlf.gov.in हे संकेतस्थळ पहावे. आवश्यकता असल्यास संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. ग्रंथालयांनी वरील पैकी कोणत्याही एका योजनेसाठीचा प्रस्ताव विहित मार्गाने व मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह इंग्रजी/ हिंदी भाषेत चार प्रतीत संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास दि. **३१/०८/२०२६** पर्यत पाठवावेत, तसेच राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या ऑनलाईन प्रणालीव्दारेही ऑनलाईन पाठविण्यात यावेत, असे आवाहन श्री. अशोक मा. गाडेकर, प्र. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई यांनी केले आहे.

**(अशोक मा. गाडेकर )**
**प्र. ग्रंथालय संचालक**

# २०२६-२७ करिता प्रतिष्ठानच्या योजनांसाठी प्रस्ताव शिफारस करण्याच्या अनुषंगाने महत्वाच्या सूचना

**➢प्रस्ताव शिफारीत करण्यापूर्वी सहाय्यक ग्रंथालय संचालक व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांनी पुढील बाबींचे व सूचनांचे अवलोकन करावे.**

१) प्रतिष्ठानच्या सर्व योजनांच्या अटी, निकष व माहिती www.rrrlf.gov.in संकेतस्थळावरुन उपलब्ध (डाऊनलोड ) करुन देण्यात आले आहे. त्याचे बारकाईने अवलोकन करावे.

२) एकाच ग्रंथालयाची २ योजनांसाठी शिफारस करण्यात येऊ नये.

३) प्रतिष्ठानच्या सर्वसाधारण धोरणानुसार समान व असमान निधीच्या कोणत्याही योजनांसाठी ग्रंथालयांची शिफारस करताना सदर ग्रंथालयाने मागील तीन वर्षात त्याच योजनेकरिता लाभ घेतला नसल्याची खात्री करुनच शिफारस करण्यात यावी.

४) लाभ घेऊ इच्छिणाऱ्या ग्रंथालयांनी मागील काळात प्रतिष्ठानच्या योजनांचा लाभ घेतला आहे काय ? वा लाभ घेतला असल्यास विहित नमुन्यात उपयोगिता प्रमाणपत्रे त्यांनी पाठविली आहे का ? हे तपासून पहावे व अद्याप पाठविले नसल्यास शिफारस करण्यात येऊ नये.

५) प्रतिष्ठानच्या कोणत्याही योजनांची शिफारस करताना ते ग्रंथालय सेवा नियमाप्रमाणे देत असल्याची खात्री करुनच शिफारस करावी.

६) ज्या योजनेसाठी संबंधित ग्रंथालयाने प्रस्ताव सादर केला आहे, त्या योजनेचा विहित नमुन्यातील अर्ज पूर्ण भरलेला असावा व त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे दिलेल्या नमुन्यात व क्रमानुसार जोडण्यात यावी, व त्याचे पृष्ठांकन केल्याची आपल्या स्तरावर खात्री करण्यात यावी. तसेच सहाय्यक ग्रंथालय संचालक व जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांनी छाननी अहवाल (Scrutiny Report) व्यवस्थित तयार करुन सही व शिक्का असल्याबाबत खात्री करुन प्रस्ताव सादर करावा.

७) ज्या प्रस्तावामध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत, जसे की, कोटेशनवरील जीएसटी क्रमांक, हमीपत्र, एनजीओ नोंदणी इ. त्या ग्रंथालयांना लेखी पत्र देऊन संबंधित त्रुटींची पूर्तता त्वरित करुन घ्यावी. विहित कालावधीत सदर ग्रंथालयाने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्यास प्रस्ताव आपल्या स्तरावर निकाली काढण्यात यावा व अशिफारीत ग्रंथालयांची यादी कारणासह सग्रंस यांना सादर करावी. सग्रंस कार्यालयांनी अशिफारीत ग्रंथालयांची विभागस्तरावर एकत्रित यादी संचालनालयास सादर करावी.

८) असमान निधी योजनेंतर्गत १)ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ,साधन सामग्री, फर्निचर, इमारत बांधकाम व इमारत विस्तार २)राष्ट्रीयस्तरीय चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व जागरुकता कार्यक्रम आयोजनासाठी अर्थसहाय्य या योजनांसाठी ग्रंथालयांनी http://ngo.india.gov.in या नॅशनल पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक आहे. ३) असमान निधी योजनेंतर्गत इमारत बांधकाम योजनेसाठी प्रस्ताव सादर करताना स्वत:ची जमीन/जागा/ बक्षिसपत्र स्वरुपात असणे आवश्यक आहे. ४) ज्ञानकोपरा स्थापन करण्याबाबत प्रस्ताव सादर करताना प्रस्तावित चार विभागांसाठी प्रत्येकी किमान १० X१० चौ.फू. स्वतंत्र जागा ग्रंथालयात उपलब्ध असणेआवश्यक आहे.

९) योजनेंतर्गत ज्या ज्या ठिकाणी दरपत्रकांची (Quotation)आवश्यकता आहे, तेथे मान्यताप्राप्त पुरठदाराचे दरपत्रक वैध GST क्रमांक, वस्तूंची संख्या, किंमत कंपनीचे नाव असणे आवश्यक आहे. GST क्रमांक GST Portal वर तपासून खात्री करावी व तेथे स्वाक्षरी करावी. किमान चार पुरवठादारांचे Quotation विवरणासह व तुलनात्मक तक्त्यासह जोडावे त्यावर संबंधित पुरवठादाराचा सही व शिक्का असणे आवश्यक आहे.

१०) ग्रंथालयाचे सन २०२५-२६ या वर्षाचा वार्षिक अहवाल तसेच मागील तीन वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल (सन २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६) आवश्यक त्या विवरणपत्रांसह तसेच दाखलनोंद वहीच्या शेवटच्या दोन पानांची छायाप्रत ग्रंथालयाच्या सही शिक्क्यासह प्रस्तावांसोबत असावा.

११) प्रस्ताव A-४ साईजमध्ये पुठ्ठा फाईल, स्पाईरल बाईंडिंग मध्ये व्यवस्थित बांधणी केलेला असावा.

१२) समान निधीतील ग्रंथसंच, बुककेस/कपाटे/रॅक्स योजना, संगणक व युपीएस या "केंद्रिय पध्दतीने खरेदी " यासाठी असल्यामूळे या योजनांसाठी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा स्वतंत्र प्रस्ताव अपेक्षित नाही. (त्यामुळे समान निधी योजनेअंतर्गत "इमारत बांधकाम व विस्तार" या योजनेव्यतिरिक्त इतर प्रस्ताव शिफारीत करु नये.)

१३) इमारत बांधकाम या योजनेचा लाभ दहा वर्षातून एकदा दिला जातो. ज्या ग्रंथालयांना याचा लाभ देण्याचे प्रस्तावित केले आहे,त्या ग्रंथालयांना मागील १० वर्षात दिलेल्या योजनांच्या लाभाचा तपशील कळविण्यात यावा.

१४) संबंधित वाचनालयाने ज्या योजनेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. त्याच योजनेचा अर्ज विहित नमुन्यात आहे का? हे तपासून पाहावे. (अनेक वेळा प्रस्ताव "ज्ञानकोपरा" या योजनेसाठी सादर करण्यात येतो व अर्ज "बालकोपरा या योजनेसाठीचा भरला जातो तसेच समान निधीचा प्रस्ताव असमान निधीच्या फॉर्ममध्ये भरल्याचे निदर्शनास आले आहे.)

१५) सन २०२६-२७ साठी समाननिधी/असमान निधी योजनेंतर्गत विविध योजनांसाठी प्रस्ताव सादर करताना संचालनालयाचे पत्र क्र. ३१/२०२३-२४/४०८३ दि. २५/०८/२०२३ अन्वये ग्रंथालयांच्या सद्य:स्थिती-बाबतचे सग्रंसं/ जिग्रंअ यांचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक राहील.

१६) इमारत बांधकामाचे प्रस्ताव सादर करताना खरेदी खत (Registration / बक्षिसपत्र (Gift Deed)/दानपत्र (Deed of convence) इ. दस्ताऐवज तयार करताना ग्रंथालयाच्या नावाचा प्रथम उल्लेख करुन करिता /तर्फे अध्यक्ष/सचिव (व्यक्तीचे नाव कंसात) असावे. करारपत्र हे एखादया व्यक्तीच्या किंवा वैयक्तिक नावे नसावे. जमिनीचा मूळ मालक हाच ग्रंथालयाचा अध्यक्ष/सेक्रेटरी असू नये. किंवा पती/पत्नी यांच्यामध्ये जागेचा करार नसावा. स.ग्रं.सं/जि.ग्रं.अ यांनी प्रस्तावातील करारपत्रातील मजकूर व्यवस्थित वाचून त्यामध्ये वरीलप्रमाणे चुका आढळल्यास त्या दुरुस्त करुनच प्रस्ताव पुढे पाठवावा.

➢ **योजनानिहाय सूचना :-**

**अ) इमारत बांधकाम व विस्तार अर्थसहाय्य**

१) सन २०२६-२७ साठी परिपूर्ण असलेलेच प्रस्ताव संचालनालयास सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव व अपूर्ण प्रस्ताव आपल्यास्तरावरून निकाली काढावेत.

२) नियोजित इमारत बांधकाम / विस्तार इ. साठीचा अंदाजित खर्च हा प्रतिष्ठानकडून दिल्या जाणा-या किमान अर्थसहाय्यापेक्षा अधिक असल्यास, त्या मर्यादेपेक्षा लागणारा उर्वरित खर्च ग्रंथालय सोसणार असल्याचे साधार (undertaking) प्रस्तावासोबत असावे.

३) नियोजित इमारत बांधकाम आराखडयाची Ammonia Print तथा सदर नकाशा स्थानिक स्वराज संस्थेने मान्य केलेला असावा. उदा. ग्रामपंचायत,न.पा., म.न.पा.,इ.

४) बांधकाम अंदाजपत्रकात व आराखडयात वीज. सॅनिटेशन,पाणी पुरवठा व्यवस्था इ.यांचा समावेश असावा.

५) इमारत बांधकाम/ विस्तार या योजनेंतर्गत जागेबाबतचा नोंदणीकृत करारनामा किंवा इतर तत्सम करार हे नोटरीने साक्षांकित केलेले असावेत.

६) जिल्हा शासकीय अभियोक्त्याचे (District Government Pleader) चे प्रमाणपत्र मूळ प्रतीत असणे आवश्यक असून त्यामध्ये सही/शिक्का व गोल सील (Government emblem) असणे आवश्यक आहे.

७) जागेबाबतचा ग्रंथालयाचा मालकी हक्क दर्शविणारा नोंदणीकृत करारनामा/बक्षिसपत्र किंवा इतर तत्सम करार मूळ मराठी भाषेत असल्यास त्याचे इंग्रजी भाषांतर केलेली प्रत प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. सदर जागा स्वत:च्या मालकीची किंवा ३० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वर्षाचा करार (Deed) असणे आवश्यक आहे.

८) या योजनेंतर्गत समान व असमान निधीसाठी शहरी ग्रंथालयांसाठी अनुक्रमे २००० तर ग्रामीण ग्रंथालयांसाठी १००० ग्रंथ असणे आवश्यक आहे.

९) या योजनेचा लाभ घेणाऱ्या ग्रंथालयांचे NGO संस्था नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१०) या योजनेसाठी ग्रंथालयास दहा वर्षातून एकदा अर्थसहाय्य दिले जाते, शिफारस करतान ही बाब प्रकर्षाने पहावी. तसेच, प्रस्तावित ग्रंथालयांना मागील १० वर्षात देण्यातआलेल्या प्रतिष्ठानच्या योजनांच्या लाभाचा तपशील बाबनिहाय विवरणपत्रात सादर करावा.

११) असमान निधी योजनेंतर्गत विविध प्रस्तावांसाठी प्रतिष्ठानच्या www.rrrlf.gov.in संकेतस्थळावरुन माहिती व अर्ज उपलब्ध(डाऊनलोड ) करुन त्यात देण्यात आलेल्या सूचना, अटी व निकष यांचे अवलोकन करुन प्रस्ताव शिफारीत करण्यात यावेत.

**यापूर्वी विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी प्रतिष्ठानकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांवर प्रतिष्ठानकडून अनेक त्रुटी काढण्यात आल्यामुळे लाभार्थी वाचनालयास संबंधित योजनेचा लाभ मिळण्यास विलंब होत आहे. तसेच, लाभार्थी ग्रंथालयांकडून त्रुटींची पूर्तता तात्काळ पूर्ण होत नाही. त्यामुळे यापुढे प्रस्ताव सादर करताना तो परिपूर्ण व विहित मुदतीत संचालनालयास सादर होणे अपेक्षित आहे. अन्यथा असे प्रस्ताव ग्रंथालय संचालनालयाकडून अशिफारीत करण्यात येतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यालय प्रमुखाची असेल, याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.**

--------------*********--------------